<u>**परिशिष्ट-अ**</u>

## सन 2017-18 ची शिष्यवृत्ती / शिक्षण फी मिळण्यासाठी बंधपत्र (Indemnity Bond)

**(शासन निर्णय क्र. इबीसी - 2017/प्र.क्र. 525 /शिक्षण -1 दि. 8.12.2017 च्या अनुरोधाने)**

**अ) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे हमीपत्र / प्रतिज्ञापत्र**

1) मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबतच्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आ हेत. अर्जात वरीलप्रमाणे दिलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधाना प्रमाणे होणाऱ्या दंडास / शिक्षेस मी / आम्ही पात्र आहे / आहोत. त्यापैकी कोणतीही माहिती व निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची रक्कम जास्तीची मिळाली तर मी / आम्ही परत करेन / करु अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे परत करण्याची हमी देतो. उत्पन्नाची व जातीची माहिती खोटी आढळल्यास माझे / माझे पाल्याचे विरुध्द होणाऱ्या कारवाईस मी / आम्ही स्वत: जबाबदार राहू

2) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे मी सक्षम अधिकाऱ्याकडून / प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार / दुरुस्ती / बदल केलेला नाही. ती खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी / आम्ही पुर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम 199 व 200 नुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी पात्र राहीन याची मला पुर्ण जाणीव आहे.

3) सन 2017-18 या वर्षाची शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम बॅक खात्यात जमा होताच मी ती महाविद्यालयास सात दिवसात जमा करुन रितसर पावती प्राप्त करुन घेण्याची माझी / आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उदभवणाऱ्या परिणामास मी / आम्ही वैयक्तीक जबाबदार असु असे प्रतिज्ञापुर्वक हमीपत्र / बंधपत्र मी / आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण :

दिनांक :

(अर्जदाराच्या वडीलांची / पालकाची सही व नाव ) (अर्जदाराची सही व नाव )